**CNR-MHYA110001642022** **सं.ख.क. 71/2022**

**फौजदारी प्रकिया संहितेच्या (1974चा अधिनियम दोन) प्रकरण एकविस अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेलाचा संक्षिप्त खटला अनुकमांक 71/2022 याचा अभिलेख न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरखेड यांचे न्यायालय**

**01.** फिर्यादी पक्ष : सरकार तर्फे पोलीस ठाणे पोफाळी

**02.** आरोपीचे नांव व पत्ताः सुधाकर किसनराव जाधव, वय : 69 वर्ष, रा. कुपटी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ.

**03.** ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल –

दिनांक 20/05/2021 रोजी 18:00 ते 18:30 वाजेच्या दरम्यान कुपटी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ येथे तुम्ही बेकायदेशीपणे किंवा निष्काळजीपणे मास्क न घालता संचारबंदी आदेशाचे उलंघन करून सार्वजनीक रोडवर फिरताना मिळुन आलात व कोरोना विषाणुचा संसर्ग पसरविण्याची घातक कृती केली, ज्याची तुम्हाला माहिती किंवा विश्वास होता की, त्याचा संसर्ग होवु शकतो. त्याअन्वये तुम्ही भा. द. वि. कलम 269 खालील शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

**04. आरोपीचे प्रतिकथन**

प्रश्न 01 : तुम्हांला केसच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय.
प्रश्न 02 : तुम्हांला आता मराठीतून वाचुन दाखविलेला आरोप समजला काय?
उत्तर : होय.
प्रश्न 03 : तुम्हांला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे.

स्वा/– स्वा/–
आरोपीची सही/अंगठा न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., उमरखेड

**निष्कर्ष**

आरोपीने सदरचा गुन्हा कबुल केला व तशी पुरसीस दाखल केली. त्याचेवर गुन्हा कबुल करण्यासाठी कोणाचा दबाव आहे काय, अशी त्यास विचारणा केली. परंतु, त्याने कोणाचाही दबाव नसल्याचे सांगितले. त्यास गुन्हा कबुल केल्यानंतर होणा–या शिक्षेची जाणीव करुन दिली. तरी त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. त्यामुळे त्याची कबुली स्वेच्छेने केल्याचे आढळुन आले. म्हणुन त्याची कबुली स्विकारण्यात येते. म्हणुन त्याचे कबुलीवरुन त्यास भारतीय दंड संहिता कलम 269 खाली दोषी धरण्यात येते व त्यास **रुपये 200/–** इतका दंड ठोठावणे उचित ठरते. या सर्व बाबींचा विचार करुन खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

**आदेश**

आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 252 नुसार भारतीय दंड संहिता कलम 269 खालील अपराधासाठी रक्कम **रुपये 200/– अक्षरी रुपये दोनशे फक्त** इतका दंड ठोठावण्यात येतो. दंड न भरल्यास **02** दिवसाची साधी कारावासाची कैद फर्मविण्यात येत आहे.

स्वा/–
दिनांक : 28/01/2022 न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., उमरखेड